11 APR 2026

जनप्रवास

# राष्ट्रसंतांच्या शिकवणीप्रमाणे वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासा

## • प्रा. डॉ. जगन कराडे : सामाजिक समता सप्ताह निमित्त विवेकानंद महाविद्यालयात व्याख्यान

**जनप्रवास : कोल्हापूर**

राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या प्रबोधनाच्या वाटेवर चालताना अंधश्रद्धा, रुढी, परंपरा यांना टाळून वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे गरजेचे आहे, असे मत प्रा. डॉ. जगन कराडे यांनी व्यक्त केले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण व विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंद महाविद्यालय येथे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह अंतर्गत महाडच्या चवदार तळ्याचे शताब्दी वर्ष, राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य तसेच क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीच्या निमित्ताने प्रा. डॉ. जगन कराडे यांचे व्याख्यान झाले.

या कार्यक्रमास समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त, सचिन साळे, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे, महाविद्यालयाचे कुलसचिव अमित आव्हाड, वरीष्ठ समाज कल्याण निरीक्षक सुप्रिया काळे, समाज कल्याण निरीक्षक अतुल पवार, सुनील पाटील व इतर अधिकारी कर्मचारी, तालुका समन्वयक सचिन परब, समतादूत आशा रावण, सुनंदा मेटकरी, प्रतिभा सावंत, किरण कांबळे तसेच विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक साळे यांनी तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. सपाटे यांनी केले

11 APR 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात 'सुरण' फुलले

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या बॉटेनिकल गार्डनमध्ये सुरण या वनस्पतीला फुलोरा आला असून, निसर्गप्रेमी आणि वनस्पतीशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी ही विशेष संधी आहे. 'एलिफंट फूट याम' किंवा मृतदेहासारखा वास येणारे फूल म्हणून 'कॉर्प्स फ्लॉवर' नावाने ओळखल्या जाणाऱ्या या वनस्पतीचा फुलोरा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो.



ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव यांनी सांगितले, सामान्यपणे मान्सूनपूर्व काळात फुलणाऱ्या या वनस्पतीचे फूल आकाराने मोठे असते. त्यातून येणारा तीव्र दुर्गंध हा सडलेल्या मांसासारखा वाटतो. ही वनस्पती प्रामुख्याने दक्षिण-पूर्व आशिया आणि भारतातील उष्ण कटिबंधीय प्रदेशात आढळते. स्थानिक पातळीवर 'सुरण' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या वनस्पतीचे कंद खाद्य म्हणून वापरले जाते; मात्र तिचा फुलोरा हा काही वर्षांतून एकदाच घडणारे अतिशय देखणे नैसर्गिक दृश्य असते, असे ते म्हणाले. यावेळी डॉ. सावलीराम घाणे, कर्नाटक विद्यापीठाचे डॉ. संतोष जयागौडर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 APR 2026

महा न्यूज & व्ह्यूज




# माणूस म्हणून मान्यतेसाठीच बाबासाहेबांकडून धम्मस्वीकार : प्रा. सुकुमार कांबळे


## शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाला प्रारंभ

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

माणूस म्हणून जगायचे असेल, तर बुद्धाच्या धम्माशिवाय पर्याय नाही. तसेच, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित जीवन जगण्याचा मार्ग म्हणूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुकुमार कांबळे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे उद्घाटन आज प्रा. कांबळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन' या विषयावर त्यांचे विशेष व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

प्रा. सुकुमार कांबळे यांनी आपल्या व्याख्यानात धम्माचे मानवी मूल्य आणि सामाजिक परिवर्तनातील महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, प्राचीन काळातील वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था आणि विषमताधिष्ठित रचनेने समाजात माणसाला माणूस म्हणून मान्यता दिली नाही. हीच अन्यायकारक व्यवस्था पालटून टाकण्यासाठी बुद्धांनी बहुजन हिताय, बहुजन सुखाय हा मानवकल्याणाचा मार्ग दिला. सिद्धार्थ गौतम राजघराण्यात जन्माला आले असले तरी त्यांनी अन्यायाविरुद्ध आवाज उठवत सत्य आणि मानवकल्याणाचा शोध घेतला. रोहिणी नदीच्या पाण्यावरून उद्भवलेल्या संघर्षाच्या वेळी त्यांनी युद्धाला विरोध करत शांततामय मार्गाचा आग्रह धरला. निसर्गाच्या संसाधनासाठी माणसाने माणसाचा जीव घेऊ नये, हा त्यांचा विचार पुढे बुद्धधम्माच्या तत्त्वज्ञानात दिसून येतो. सिद्धार्थांनी उपवास, तपश्चर्या आणि विविध तत्त्वज्ञानांचा अभ्यास व चिंतन करून शेवटी माणसाच्या दुःखाचे मूळ तृष्णा' असल्याचे सांगितले. अत्त दीप भव या संदेशातून त्यांनी प्रत्येकाला स्वतःच्या विवेकबुद्धीने विचार करून जीवन जगण्याचा मार्ग दिला.




ते म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील अस्पृश्यता, अन्याय आणि विषमता अनुभवली होती. महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिरप्रवेश या चळवळींच्या माध्यमातून त्यांनी मूलभूत मानवी हक्कांसाठी लढा दिला. यावेळी आलेल्या विदारक अनुभवातून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवण्यासाठी नव्या मार्गाची गरज असल्याच्या निष्कर्षापर्यंत ते आले. याच चिंतनातून १९५६ मध्ये त्यांनी बुद्धाचा धम्म स्वीकारला. हे केवळ धर्मांतर नव्हते, तर सामाजिक क्रांतीचा निर्णायक टप्पा होता. बुद्धधर्म हा विज्ञाननिष्ठ, तर्कसंगत आणि प्रश्न विचारण्यास प्रोत्साहन देणारा आहे. अंधश्रद्धेला स्थान न देता विचारस्वातंत्र्य देतो. त्यामुळे आजच्या काळातही बुद्धधम्म मानवकल्याणासाठीचा अत्यंत उपयुक्त मार्ग आहे.

फुले-शाहू-आंबेडकर या त्रयीच्या विचारांचा एकात्म दृष्टिकोन मांडण्याची आज गरज असल्याचे अधोरेखित करताना अध्यक्षीय मनोगतात डॉ. विलास शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोकाभिमुख आणि कर्तव्यदक्ष कार्यातूनच महात्मा जोतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांच्या परंपरा विकसनाला बळ लाभले असावे, असे अभ्यासांती माझे मत बनले आहे. शेतकरी हित, स्त्री सन्मान आणि शिक्षण या तीन प्रमुख आधारस्तंभांवर या सर्व महापुरुषांचे कार्य उभे असून, समाजपरिवर्तनाचा हा व्यापक वारसा समजून घेण्यासाठी त्यांच्या विचारकार्याचा तुकड्या-तुकड्यांत नव्हे, तर एकत्रित विचार करण्याची आवश्यकता आहे. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या आंबेडकरी संदेशाचा पाया शिक्षण' असून विद्यार्थ्यांनी विवेकनिष्ठ, चिकित्सक आणि स्वविचारक्षम बनण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी अविनाश भाले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. हरिष भालेराव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
11 APR 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात सुरण फुलले

## बॉटेनिकल गार्डनमध्ये दुर्मीळ फूल पाहण्याची निसर्गप्रेमींना संधी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या बॉटेनिकल गार्डनमध्ये सुरण वनस्पतीला फुलोरा आला आहे. निसर्गप्रेमी, वनस्पतीशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी ही संधी आहे. 'एलिफंट फूट' किंवा मृतदेहासारखा वास येणारे फूल म्हणून 'कॉर्प्स फ्लॉवर' नावाने ओळखल्या जाणाऱ्या या वनस्पतीचा फुलोरा वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो.

सामान्यपणे मान्सूनपूर्व काळात फुलणाऱ्या या वनस्पतीचे फूल आकाराने मोठे असते. त्यातून येणारा तीव्र दुर्गंध हा सडलेल्या मांसासारखा वाटतो. ही वनस्पती प्रामुख्याने दक्षिण-पूर्व आशिया आणि भारतातील उष्ण कटिबंधीय प्रदेशात आढळते. स्थानिक पातळीवर सुरण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या वनस्पतीचे कंद खाद्य म्हणून वापरले जाते; मात्र तिचा फुलोरा हा काही वर्षांतून एकदाच घडणारे देखणे नैसर्गिक दृश्य असते. फूलरचनेत मोठ्या, लहरी, जांभळट-तपकिरी रंगाच्या स्पेथ नावाच्या आवरणात मध्यभागी मांसल स्पॅडिक्स असतो. पूर्ण फुलोऱ्यात हे फूल साधारणपणे २ ते ३ फूट उंच वाढते, त्यामुळे ते आकर्षक दिसते. या फुलोऱ्याचा कालावधी मर्यादित असून, ते साधारणतः २४ ते ४८ तासांपर्यंतच टिकते. त्यानंतर स्पॅडिक्स हळूहळू कोमेजू लागतो. सध्या हे फूल पूर्ण बहरात असून, इच्छुक विद्यार्थी व नागरिकांना विद्यापीठाच्या लीड बॉटेनिकल गार्डनमध्ये ते पाहता येईल. आठवड्याच्या अखेरपर्यंत हा फुलोरा ओसरण्याची शक्यता आहे, अशी माहिती ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव यांनी दिली. यावेळी डॉ. सावलीराम घाणे व कर्नाटक विद्यापीठाचे डॉ. संतोष जयागौडर उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दुर्मीळ व आकर्षक सुरणाचे फूल.** (छाया : पप्पू अत्तार)

11 APR 2026

सकाळ

# विद्यापीठात बोटॅनिकल गार्डनमध्ये फुलले 'सुरण'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बोटॅनिकल गार्डनमध्ये फुललेले 'सुरण'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या बोटॅनिकल गार्डनमध्ये 'सुरण' या वनस्पतीला फुलोरा आला आहे. निसर्गप्रेमी आणि वनस्पतीशास्त्राच्या विद्यार्थ्यांना हे दुर्मीळ फूल पाहण्याची संधी उपलब्ध झाली आहे. 'एलीफंट फूट याम' किंवा मृतदेहासारखा वास येणारे फूल म्हणून 'कॉर्प्स फ्लॉवर' नावाने ओळखल्या जाणाऱ्या या वनस्पतीचा फुलोरा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो. ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एस.आर. यादव यांनी 'सुरण'ची माहिती दिली. सामान्यपणे मॉन्सूनपूर्व काळात फुलणाऱ्या या वनस्पतीचे फूल आकाराने मोठे असते. त्यातून येणारा तीव्र दुर्गंध हा सडलेल्या मांसासारखा वाटतो. ही वनस्पती प्रामुख्याने दक्षिण-पूर्व आशिया आणि भारतातील उष्ण कटिबंधीय प्रदेशात आढळते. स्थानिक पातळीवर 'सुरण' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या वनस्पतीचे कंद खाद्य म्हणून वापरले जाते; मात्र तिचा फुलोरा हा काही वर्षांतून एकदाच घडणारे अतिशय देखणे नैसर्गिक दृश्य असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. सावलीराम घाणे, संतोष जयागौडर होते.

1 1 APR 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लक्षवेधी

## वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या बोटॅनिकल गार्डनमध्ये फूल पाहण्याची संधी

# शिवाजी विद्यापीठात फुलले दुर्मिळ 'सुरण'

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या बॉटनिकल गार्डनमध्ये सुरण या दुर्मिळ माणल्या जाणाऱ्या वनस्पतीला फुलोरा आला आहे. निसर्गप्रेमी आणि वनस्पतीशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी ही विशेष संधी चालून आली आहे. 'एलीफंट फूट याम' किंवा मृतदेहासारखा वास येणारे फूल म्हणून 'कॉर्प्स फ्लॉवर' नावाने ओळखल्या जाणाऱ्या या वनस्पतीचा फुलोरा अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो.

ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव यांनी यासंदर्भात दिलेल्या माहितीनुसार, सामान्यपणे मान्सूनपूर्व काळात फुलणाऱ्या या वनस्पतीचे फूल आकाराने मोठे असते. त्यातून येणारा तीव्र दुर्गंध हा सडलेल्या मांसासारखा वाटतो. ही वनस्पती प्रामुख्याने दक्षिण-पूर्व आशिया आणि भारतातील उष्ण



दुर्मिळ व आकर्षक सुरणाचे फूल



सुरणाची पाहणी करताना ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव सोबत डॉ. सावलीराम घाणे, डॉ. संतोष जयागौडर.

कटिबंधीय प्रदेशात आढळते. स्थानिक पातळीवर 'सुरण' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या वनस्पतीचे कंद खाद्य म्हणून वापरले जाते; मात्र तिचा फुलोरा हा काही वर्षांतून एकदाच घडणारे अतिशय देखणे नैसर्गिक दृश्य असते.

या फुलरचनेत मोठ्या, लहरी, जांभळट-तपकिरी रंगाच्या 'स्पेथ' नावाच्या आवरणात मध्यभागी मांसल 'स्पॅडिक्स' असतो. पूर्ण फुलोऱ्यात हे फूल साधारणपणे २ ते ३ फूट उंच वाढते, त्यामुळे ते अत्यंत आकर्षक दिसते. या फुलोऱ्याचा कालावधी अत्यंत मर्यादित असून ते साधारणतः २४ ते ४८ तासांपर्यंतच टिकते. त्यानंतर स्पॅडिक्स हळूहळू कोमेजू लागतो.

शिवाजी विद्यापीठाचा वनस्पतीशास्त्र विभाग पश्चिम घाटातील दुर्मिळ व संकटग्रस्त वनस्पतींच्या संवर्धनासाठी ओळखला जातो. संशोधकांसाठी हा फुलोरा अरासी कुलातील वनस्पतींच्या प्रजननशास्त्र आणि परागीभवन प्रक्रियेचा अभ्यास करण्याची एक महत्त्वाची संधी उपलब्ध करून देतो. सध्या हे फूल पूर्ण बहरात असून इच्छुक विद्यार्थी व नागरिकांना विद्यापीठाच्या लीड बॉटनिकल गार्डनमध्ये पहावा, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे. यावेळी डॉ. यादव यांच्यासमवेत डॉ. सावलीराम घाणे आणि कर्नाटक विद्यापीठाचे डॉ. संतोष जयागौडर होते.

### वनस्पती उत्क्रांतीतील रोचक उदाहरण

**ही वनस्पती उत्क्रांतीतील एक अत्यंत रोचक उदाहरण आहे. ती सडलेल्या सेंद्रिय पदार्थासारखा वास निर्माण करून विशिष्ट परागीभवन करणाऱ्या कीटकांना आकर्षित करते, ज्यामुळे गर्दीच्या परिसंस्थेतही तिचे परागीभवन सुनिश्चित होते. विशेषतः माश्या आणि भुंगे हे या वनस्पतीचे मुख्य परागीभवन करणारे घटक आहेत.**

जनसंपर्क कक्ष
1 APR 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# म्हणूनच डॉ. आंबेडकर यांनी गौतम बुद्धांच्या धम्माचा केला स्वीकार



## ● प्रा. सुकुमार कांबळे : शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे उद्‌घाटन

**जनप्रवास : कोल्हापूर**

माणूस म्हणून जगायचे असेल, तर बुद्धाच्या धम्माशिवाय पर्याय नाही, या जाणीवेतून आणि समता,स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित जीवन जगण्याचा मार्ग म्हणूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गौतम बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुकुमार कांबळे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे उद्‌घाटन शुक्रवारी प्रा. कांबळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धम्मचिंतन'या विषयावर त्यांचे विशेष व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. प्रा. कांबळे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील अस्पृश्यता,अन्याय आणि विषमता अनुभवली होती. महाडचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश या चळवळींच्या माध्यमातून त्यांनी मूलभूत मानवी हक्कांसाठी लढा दिला. याच चिंतनातून १९५६ मध्ये त्यांनी बुद्धाचा धम्म स्वीकारला.

डॉ. विलास शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोकाभिमुख आणि कर्तव्यदक्ष कार्यातूनच महात्मा जोतिराव फुले,छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांच्या परंपरा विकसनाला बळ लाभले असावे, असे अभ्यासांती माझे मत बनले आहे. तसेच शेतकरी हित, स्त्री सन्मान आणि शिक्षण या तीन प्रमुख आधारस्तंभांवर या सर्व महापुरुषांचे कार्य उभे असून, समाजपरिवर्तनाचा हा व्यापक वारसा समजून घेण्यासाठी त्यांच्या विचारकार्याचा तुकड्या-तुकड्यांत नव्हे, तर एकत्रित विचार करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अविनाश भाले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. हरिष भालेराव, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.